निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २०२ वा.
गुरुवार - २५ सप्टेंबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247


# सर्व निकष बाजूला ठेवून शेतकऱ्यांना सरसकट मदत; दिवाळीपूर्वी मदतीचे वितरण करणार - मुख्यमंत्री फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**लातूर/ प्रतिनिधी/** राज्यात अनेक ठिकाणी ढगफुटी सदृश पाऊस झाल्याने नद्यांना पूर आला आहे. पिकांचे नुकसान झाले असून जमीन खरडून गेली आहे. या संकटकाळात राज्य शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून सर्व निकष बाजूला ठेवून सर्व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट मदत केली जाईल. तसेच दिवाळीपूर्वीच ही मदत शेतकऱ्यांना वितरित करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी औसा तालुक्यातील उजनी आणि निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी येथे अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधून नुकसानीची माहिती घेतली.

जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, खासदार ओमप्रकाशराजे निंबाळकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार संजय बनसोडे, आमदार रमेश कराड, आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार कैलास पाटील, माजी आमदार बसवराज पाटील, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, उजनी येथे उपस्थित होते. तर औराद शहाजानी येथे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, विभागीय आयुक्त पापळकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल मीना, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळाचे अधीक्षक अभियंता आय.एम. चिश्ती उपस्थित होते.

### पंचनाम्यासाठी ड्रोन, मोबाईल फोटो ग्राह्य

नुकसान झालेल्या भागातील पंचनाम्याची कार्यवाही सुरू आहे. ज्या भागात पाणी शिरले अशी नोंद आहे, पण तिथे पोहचणे शक्य नाही, अशा ठिकाणी ड्रोनद्वारे करण्यात आलेला पंचनामाही ग्राह्य धरण्यात येईल. तसेच मोबाईलवरील फोटोही स्वीकारण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्वप्रथम औसा ते तुळजापूर महामार्गावरील पुलावरून तेरणा नदीपात्राची, नदीला आलेल्या पुरामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीची पाहणी केली. त्यानंतर उजनी गावालगत असलेल्या तेरणा नदीपात्राची व पुरामुळे गावातील घरे, दुकानांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी करून शेतकरी, ग्रामस्थांकडून शेतपिकांच्या नुकसानीची माहिती घेतली.



टंचाईच्या काळात लागू असलेल्या उपाययोजना अतिवृष्टीतही लागू करण्यात येतील. शेतकऱ्यांना अधिकाधिक मदत करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी घरात, दुकानात शिरल्याने झालेल्या नुकसानीचीही मदत देण्यात येईल. मंगळवारीच राज्य शासनाने नुकसानग्रस्तांसाठी मदतीचा २ हजार २०० कोटींचा पहिला हप्ता मंजूर केला. ज्याप्रमाणे नुकसानीचे अहवाल प्राप्त होतील, त्यानुसार अधिकची मदत केली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. उजनी गावालगत तेरणा नदीवर औसा व तुळजापूर तालुक्याला जोडणाऱ्या पुलाची उभारणी, तसेच उजनी गाव ते राष्ट्रीय महामार्गावरील उजनी मोडला जोडणाऱ्या रस्त्याच्या कामाला मंजुरी देण्याची घोषणाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केली.

पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. नदीकाठच्या जमिनी खरडून गेल्याने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिकची मदत मिळावी, अशी मागणी आमदार अभिमन्यू पवार यांनी यावेळी केली. आमदार संजय बनसोडे यांनीही उदगीर, जळकोट तालुक्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीच्या मदतीबाबत मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले.

### बांधावर जाऊन मुख्यमंत्र्यांनी जाणून घेतल्या शेतकऱ्यांच्या व्यथा

महाराष्ट्र, कर्नाटक सीमेवर तेरणा आणि मांजरा नदीच्या संगमावर असलेल्या औराद शहाजानी येथील नुकसानग्रस्त भागाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधला. शेतकरी शिवपूत्र आगरे यांनी त्यांच्या शेतात शिरलेल्या पाण्याची आणि नुकसानीची व इतर ग्रामस्थांनी मूग, उडीद, मका, सोयाबीन आदी पिकांच्या नुकसानीची माहिती मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांना दिली. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचा विश्वास त्यांना दिला. शेतकऱ्यांनी काळजी करू नये, शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्र्यांनी दिली.

कमी कालावधीत अधिक पाऊस पडल्यामुळे नदीमध्ये येणाऱ्या पाण्यात अचानक वाढ होते, त्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होते, त्यासाठी नदीवर बॅरेजसची उभारणी करून पुरावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. औराद शहाजानी येथील पुराचा प्रश्न सोडविण्यासाठी पूर संरक्षक भिंत बांधण्यात येईल. जुन्या बॅरेजसच्या नूतनीकरणाचा कार्यक्रम हाती घेण्यात येईल. या बॅरेजसला आधुनिक पद्धतीचे दरवाजे बसविण्यात येतील, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

औराद येथे मांजरा व तेरणा नद्याच्या संगमामुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. पिकाच्या नुकसानीसह जमीन खरडून गेली आहे.

मांजरा, तेरणा नदीच्या संगमामुळे नदी पात्र वाढते, म्हणून आमदार संभाजी पाटील निलंगेकर यांनी काही बॅरेजेसबाबत सुचवले आहे, त्यानुसारही कार्यवाही करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# जालना जिल्ह्यातील पूरग्रस्त भागाची पालकमंत्री पंकजा मुंढे यांनी केली पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** जालना जिल्ह्यातील काही भागात मुसळधार पाऊस झाल्याने गोदावरी नदीला पूर आला आहे त्यामुळे नदीच्या काठावरील अनेक गावामध्ये जनजीवन विस्कळीत झाले आहे. जिल्ह्यातील काही गावात देखील नदीचे पाणी घुसून नागरिक पाण्यामध्ये अडकले होते. काहींच्या घरात पाणी आले होते. त्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी आज जालना जिल्ह्यातील पुरग्रस्त गावांचा दौरा केला. यावेळी श्रीमती मुंडे यांनी परतूर तालूक्यातील गोळेगाव, घनसावंगी तालुक्यातील भेंडाळा, कुंभार पिंपळगाव, मच्छिंद्रनाथ चिंचोली आणि अंबड तालुक्यातील सुखापूरी, शहापूर या गावांना भेट देऊन येथील पूरग्रस्त भागाची पाहणी केली.

यावेळी श्रीमती मुंढे यांनी नागरिकांशी संवाद साधुन, त्यांना तात्काळ मदत करणार असल्याचे आश्वासित केले. पंचनामे करण्याचे काम सुरु आहे, परंतू शासनामार्फत पुरग्रस्त भागातील बाधीत नागरिक आणि शेतकऱ्यांना तात्काळ मदत पोहोचविण्याचे काम सुरू असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

शासन नागरिकाच्या पाठीशी असून, कोणीही काळजी करू नये. बाधित नागरिकांना शासन शक्य ती मदत करणार आहे. परतूर तालुक्यातील गोळेगावचा अनेक वर्षाचा पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित आहे. हा प्रश्न मी पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडून, पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. तसेच या पुरामुळे अनेक नागरिक बेघर झाले असून, त्यांच्या राहण्याची व जेवणाची सोय करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.



शेतपिकांच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्यांना मदत देण्यात येणार आहे. ज्या भागात ६५ मिमी पेक्षा जास्त पाऊस झाल्यास त्या भागात अतिवृष्टी घोषित करण्याचा नियम आहे. परंतु जिल्ह्यात ज्याठिकाणी ६५ मिमी पेक्षा देखील कमी पाऊस झाला असेल पण त्या ठिकाणी जास्त नुकसान झाले असल्यास त्याचेही पंचनामे करण्याच्या तसेच जिल्ह्यातील पर्जन्यमापकाची तपासणी करण्याच्या सूचना श्रीमती पंकजा मुंडे यांनी प्रशासनाला यावेळी दिल्या.

यावेळी परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर, घनसावंगी विधानसभा मतदारसंघाचे आमदार हिकमत उढाण, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एम. मिनु, परतूरचे उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसिलदार प्रतिभा गोरे, घनसावंगीचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार पूजा वंजारी, तहसीलदार विजय चव्हाण, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यासह नांदूर हवेली येथील गावकऱ्यांची उपस्थिती होती.

# निसर्ग वाचला तरच जीवन वाचेल-प्रा डॉ शरद रोडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** थील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवायोजना विभागाच्या वतीने स्वच्छता ही सेवा अभियान पंधरवाडा १७ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ या काळात राबविण्यात येत आहे . त्या निमित्त कचरा व्यवस्थापन झिरो वेस्ट मॅनेजमेंट या विषयी डॉ शरद रोडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.




या कार्यक्रमासाठी अध्यक्षा म्हणून प्राचार्या डॉ विद्या देशपांडे, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा प्रसाद देशमुख उपस्थित होते. महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी विद्यापीठाच्या निकषा नुसार इंग्रजी विभागप्रमुख डॉ खेडकर यांची विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून निवड केली. या कार्यक्रमात प्रा. डॉ.कमल खेडकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी प्रा. खेडकर यांनी त्यांच्या विद्यार्थी जीवनात आलेल्या वेगवेगळ्या प्रसंगाचा दाखला देत अभ्यास कसा करावा याबद्दल महाविद्यालयातील विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. रासेयो विभाग कार्यक्रमाधिकारी डॉ कवडे यांनी आपल्या प्रास्ताविकात विद्यार्थी जीवनात सामाजिक बांधिलकी व आपत्तिकाळात सामाजिक ' सहकार्याची जाणीव निर्माण व्हावी हाच या अभियानाचा हेतू आहे असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते प्रा डॉ शरद रोडे यांनी आपल्या मनोगतात वातावरणाला प्रदूषित करणाऱ्या ओल्या व सुक्या कचऱ्याच्या सुयोग्य व्यवस्थापनाबाबत उत्कृष्ट मार्गदर्शन केले . वातावरणाला दूषित करणाऱ्या गोष्टींचा शून्य वापर, कमी वापर किंवा पुनर्वापर करण्यावर भर दिला. आपण निसर्गाला सांभाळले तर सजीवसृष्टी अस्तित्वात राहील. एकदाच वापरण्यात येणाऱ्या कधीही विघटन न होणाऱ्या प्लास्टीकचा वापर टाळा असे विचार मांडले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांनी झाडे जगली तरच पुढील पिढी जगेल असे सांगून मोबाईलचा वापर फक्त शैक्षणिक कार्यासाठीच करा असे विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा डॉ संगिता कचरे, आभार प्रा डॉ विद्या गुळभिले यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील रासेयो कनिष्ठ विभाग कार्यक्रमाधिकारी प्रा प्रवीण फुटके यांची उपस्थिती होती.

# पिंपळवाडी (पी.) गावात अतिवृष्टिने झालेल्या नुकसानच्या पंचनाम्याला सुरुवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी/प्रतिनिधि/हारुन शेख/** पैठण तालुक्यातील पिंपळवाडी( पी.) गावात सतत होणारे मुसळधार पावसामुळे नागरिकांचे हाल चे बेहाल होताना दिसत आहे. काही ग्रामस्थांच्या घरात २ते३ फुटापर्यंत पाणी साचल्याने साप विंचवाच्या भीतीने झोपी उडाल्या आहेत,तर काही ग्रामस्थांच्या घराच्या भींती पडल्या आहेत तर काहींच्या घरावरचे छत उडून गेले आहे निसर्गाच्या या प्रकोपामुळे पिंपळवाडी गावातीलच नव्हे तर पुर्ण पैठण तालुक्यातील नागरिक हवालदिल झाले आहेत. अतिवृष्टी मुळे होणारे नुकसानीचे पंचनामे सुरु झाल्याने नागरिकांना थोडा दिलासा मिळाला आहे. या पुर्वी तलाठी रजेवर असताना त्यांच्या आदेशानुसार पोलीस पाटील, अशोक चाबुकस्वार,आणि तलाठी कार्यालयाचे कर्मचारी यांनी पंचनामे केले होते. १४ते १६ सप्टें रोजी होणारे मुसळधार पाऊसात सरपंच, उपसरपंच ,काही सदस्य,यांनी भर पाऊसात पाहणी करुन काही ग्रामस्थांची मदत केली. भर पावसात जे सी बी ने पाणी काढण्यात आले.सध्या २४ सप्टेंबर रोजी तलाठी सोणवणे हे स्वत:च पंचनामे करत आहेत. तलाठी सोबत ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य पंचनामे करताना दिसत आहेत. दैनिक आत्ताचा एक्सप्रेसच्या प्रतिनिधि शी बोलताना तलाठी सोणवणे यांनी अशी प्रतिक्रिया दिली की,आज रोजी आम्ही १५० घरांचे पाहणी करुन पंचनामे केले असुन पुढिल पंचनामे लवकरच होतील.



निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
छत्रपती संभा

**संभाजीनगर चे पालक मंत्री संजय शिरसाठ यांनी पिंपळवाडी (पी.)गावाकडे फिरवली पाठ**

आत्ताच एक्सप्रेस

पिंपळवाडी प्रतिनिधि / हारुन/ शेख/ पैठण तालुक्यातील पिंपळवाडी( पिराची) १८ सप्टें २०२५ रोजी चे दौऱ्या मध्ये पैठण तालुक्यातील १० गावाची पाहणी करणार होते. अतिवृष्टि मध्ये नुकसान झालेल्या परिवाराची भेट घेण्यासाठी पालकमंत्री संजय शिरसाठ, आमदार तथा शिवसेना जिल्हाप्रमुख विलास बापु भुमरे यांनी प्रत्येक गावात जाऊन पाहणी केली, असता पिंपळवाडी (पी.)हे गाव दौरे नियोजनात असताना सुध्दा पालक मंत्री,आमदार यांनी गावात ६०/७० घरामध्ये पाणी शिरले असताना गावाची पाहणी केली नाही. यामुळे गावतील नागरीक नाराजगी व्यक्त करत आहेत.अधिक माहीती अशी की १४ सप्टें ते १६ सप्टें २०२५ ला पिंपळवाडी परीसरा मध्ये मुसळधार पावसामुळे नागरिकांचे घरात पणी शिरल्या ने बेहाल परीस्थिती निर्माण झाली होती. संसारोपयोगी साहीत्य अन्नधान्य वाहुन गेले अणि लाखोंचे नुकसान होऊन सुध्दा आतापर्यंत कुठलेही महसुल चे कर्मचारी किंवा तहसीलदार, व कुठलेही राजकीय पुढारी तर नाहीच गावचे तलाठी सुद्धा गावात पाहणी ...

अशी की पिंपळवाडी पिराची हे धरणग्रस्त गाव आहे येथे राहणारा वर्ग हा रोजा मजुरी करणारा गरीब वर्ग आहे.विषेश बाब अशी की येथे मोठे प्रमाणात आदिवासी समाज आहे. भील्ल आदिवासी समाजाच्या झोपडया आणि शेड मध्ये पाणी शिरुन बरचेस नुकसान झाले आहे. तरी प्रशासनाचे कुठले ही पंचनामे नाही.

काहीच हालचाल करताना दिसत नाही . या गावाला कोणी वाली नाही का? अशी ग्रामस्थामध्ये चर्चा होत आहे. आपल्या गावाची आठवण राजकीय पुढारींना निवडणुकी च्या वेळेस येते अणि आपतकालीन वेळे मध्ये गावाकडे पाठ फीरवताना दिसत आहेत असा नागरीकांचा समज होत आहे.

# पूरग्रस्त लांबोटी गावाला उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोलापूर/ प्रतिनिधी/** उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मोहोळ तालुक्यातील लांबोटी गावाला भेट देऊन अतिवृष्टी व धरणातून झालेल्या पाण्याच्या विसर्गामुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीची पाहणी केली. नदीकाठच्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर झालेले नुकसान लक्षात घेता, शासनाकडून तातडीने पंचनामे करून पूरग्रस्तांना मदत दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि धरणातून दोन लाख क्युसेक पाण्याचा विसर्ग झाल्यामुळे लांबोटी परिसरात पूरस्थिती निर्माण झाली आहे. यामुळे शेतजमिनी, घरे, मंदिरांचे मोठे नुकसान झाले असून अनेक शेतकऱ्यांची पिकेही नष्ट झाली आहेत. पुराच्या पाण्यात अडकलेल्या सव्वाचार हजार नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. जनावरे वाहून गेलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून योग्य ती मदत दिली जाईल, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.



सोलापूर-पुणे महामार्गावरील लांबोटी येथील पुलावरून पाणी पातळी वाढल्यामुळे जड वाहतुकीस सुरक्षेच्या कारणास्तव बंदी घालण्यात आली असून अत्यावश्यक सेवा एकेरी मार्गाने सुरू ठेवण्यात आल्या आहेत. पूरग्रस्तांना लवकरात लवकर मदत मिळावी यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी नमूद केले.या पाहणी दौऱ्यात निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंग ठाकूर, मोहोळचे आमदार राजू खरे, माजी आमदार राजन पाटील यांच्यासह नागरिक व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मूकबधिर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना गोवर रुबेला लसीकरण-

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/ प्रतिनिधी/** खुलताबाद तालुक्यातील रसूलपुरा येथील.सोपानराव पाटील मूकबधिर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना लस देण्यात आली केंद्र व राज्य शासनाचे निर्देश अनुसार गोवर रुबेलाचे

गोरगरीब विद्यार्थी साठी या मोहीम राबवण्याचे निर्देश देण्यात आले होते अनुषंगाने तालुका आरोग्य विभागच्या वतीने तालुक्यातील सर्व आश्रम शाळा जिथे गोर, गरीब, अनाथ गरजू मुले मुली शिक्षण घेतात अश्या ५ ते १५ वयोगटातील विद्यार्थांना मोफत गोवर रुबेलाचे लसीकरण करण्याची मोहीम सुरू करण्यात आली आहे.. खुलताबाद तालुक्यातील गदाना येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या अंतर्गत रसूलपुरा व शंकरपूर वाडी या गावात असलेल्या कै.सोपानराव पाटील मूकबधिर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना मंगळवारी (दि.२३) गोवर रूबेला लस देण्यात आली. शाळेतील एकूण २८ विद्यार्थ्यांना गोवर रूबेला लस देण्यात आली.केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १५ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत गोवर व रुबेला आजारांचे निर्मूलन करण्याच्या दृष्टीने जिल्हा आरोग्य अधिकारी अभय धानोरकर यांच्या निर्देश अनुसार विशेष लसीकरण मोहीम राबवण्याचे सुरुवात खुलताबाद तालुक्यातील गदाना प्रथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या मूकबधिर आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना गोवर लसीकरण करण्यात आले या अनुषंगाने आहे. या मोहीम अंतर्गत खुलताबाद तालुक्यातील रसूलपुरा शंकरपूर वाडी या गावात शाळेतील सर्व विद्यार्थींना सर्व गदाना प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत ५ ते १५ वर्षे वयोगटातील बालकांना गोवर- रूबेला लस देण्यात आले.

# आता मदतीचा पूर येऊ द्या!

राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली जातेय. शेतक-यांसह विरोधी पक्षातील नेत्यांनी देखील ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केलीय. तर ओला दुष्काळ ही बोलीभाषेची टर्म असून सरकार शेतक-यांना मदत करणार असल्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलंय.

राज्यात मागील दोन ते तीन दिवसांपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसानं शेतक-यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतलाय. एवढंच नव्हे तर नद्या-नाल्यांना आलेल्या पुरामुळे घरांचं देखील मोठं नुकसान झालंय. त्यामुळे शेतकरी आता सरकारकडे मदतीची मागणी करतोय. राज्यात झालेल्या नुकसानाची परिस्थिती पाहून सरकारनं ओला दुष्काळ जाहीर करावी अशी मागणी विरोधकांकडून करण्यात येतीय. दरम्यान यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी देखील भाष्य केलंय.

मराठवाड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे फक्त पिकच पाण्याखाली नव्हे तर जमीनी देखील खरडून गेल्या आहेत. त्यामुळे पुढच्या अनेक पिढ्यांचं नुकसान झाल्याचं संजय राऊतांनी म्हटलंय. त्यामुळे या मराठवाड्याला जास्तीस जास्त मदत करण्याचं आवाहन त्यांनी सरकारला केलंय. तर सरकार देखील अतिरिक्त मदत करण्यासाठी तत्पर असल्याचं अजित पवारांनी म्हटलंय. जाचक अटींमध्ये शेतकरी अडकलाय त्यामुळे शेतक-यांना सरसकट नुकसान भरपाई जाहीर करा अशी मागणी शेतकरी नेते रविकांत तुपकर यांची केलीये. तर शेतक-यांना प्रति एकर किमान ५० हजार रुपये मदत तसंच श्रमहानी मोबदला म्हणून शेतमजुरांना प्रति कुटुंब तातडीची २५ हजार रुपयाची मदत जाहीर करा अशी मागणी अजित नवलेंनी केलीये.

पिकांचे नुकसान ३३ टक्के किंवा त्यापेक्षा अधिक झालंय का? हे तपासलं जातं

पावसाचे प्रमाण त्या तालुक्यात, गावात २४ तासात किंवा अल्पावधीत खूप जास्त पाऊस झाला आहे का ?

महसूल विभाग कृषी विभाग व स्थानिक प्रशासन पंचनामे करून याबाबत अहवाल सादर करतात.

शेती शिवाय घर जनावरे रस्ते पाणीपुरवठा यावर झालेला परिणामही तपासला जातो.

या अहवालांच्या आधारे जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, राज्य सरकारकडून ओला दुष्काळ घोषित

अतिवृष्टीमुळे शेतक-यांचं मोठं नुकसान झालंय. ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होतेय. मात्र, नियमांपलीकडे जाऊन शेतक-यांना मदत करण्याचं आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिलंय. तसंच दिवाळीआधी शेतक-यांच्या खात्यावर देखील पैसे जमा होणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.ओला दुष्काळ ही बोलीभाषेतील संज्ञा आहे, जी अतिवृष्टी किंवा सलग मुसळधार पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होण्याच्या परिस्थितीसाठी वापरली जाते.

यामुळे पिके पाण्याखाली जातात, शेतमाल वाहून जातो आणि शेतीयोग्य माती नष्ट होते. ही दुष्काळाच्या उलट परिस्थिती आहे, ज्यात पावसाचा अतिरेक होतो. सरकारी नियमांनुसार, कोरडवाहू शेतीसाठी प्रति हेक्टर १३ हजार रुपये आणि बागायती शेतीसाठी १८ हजार रुपये नुकसान भरपाई मिळू शकते.

मात्र, विरोधकांच्या मागणीनुसार सरसकट ५० हजार प्रति हेक्टर आणि कर्जमाफीची अपेक्षा आहे. स्थानिक प्रशासन आणि विभागीय अधिकारी पंचनामे करतात. अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर होतात, त्यानंतर विभागीय आयुक्त आणि राज्य सरकारची मंजुरी मिळते. मंत्रिमंडळ बैठकीत (जसे २३ सप्टेंबर २०२५ ची) यावर निर्णय होऊ शकतो.

## संक्षिप्त

### अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना आडसकरांचा मदतीचा हात - किराणा किट वाटप करून दिलासा



**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनीधी/** केज तालुक्यातील मांजरा पट्यातील राजेगाव, दैठणा, भोपला या गावांमध्ये गेल्या पंधरा दिवसांपासून झालेल्या सततच्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसामुळे अनेक शेतकऱ्यांच्या घरांमध्ये पाणी शिरले असून, म्हैस, बैल, गाई अशा जनावरांचेही जीव गेले आहेत. पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी आणि मजुरांच्या हाताला काम राहिलेले नाही.

या आपत्तीकाळात शेतकरी बांधवांच्या मदतीसाठी रमेशराव आडसकर व ऋषीकेश भैय्या आडसकर यांच्या नेतृत्वाखाली दि. २४ बुधवार रोजी किराणा किट वाटपाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून प्रभावित शेतकरी कुटुंबांना तातडीचा दिलासा देण्यात आला.या वेळी मा. रमेशरावजी आडसकर साहेब, श्री. ऋषिकेश भैय्यासाहेब आडसकर, कृषी उत्पन्न बाजार समिती केजचे सभापती श्री. अंकुशरावजी इंगळे, दिलीप (आबा) गुळभिले, तालुका अध्यक्ष अमर भैय्या पाटील, शिवदास तात्या पाटील तसेच सर्व सहकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

या सामाजिक उपक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, संकटाच्या काळातही आडसकर व त्यांचे कार्यकर्ते एकत्र येऊन मदतीसाठी पुढे येतात हे या उपक्रमातून दिसून आले. स्थानिक प्रशासन व सामाजिक कार्यकर्त्यांकडून अशा प्रकारच्या मदतीची अपेक्षा आगामी काळातही व्यक्त करण्यात येत आहे.

### सिंदफणा नदीच्या महापुराने कुक्कडगाव आणि परिसरातील शेतीचे आणि पिकाचे प्रचंड नुकसान



**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड (किशोर कुलकर्णी)**

बीड जिल्ह्यातील सिंदफणा नदीच्या महापुराने कुक्कडगाव आणि परिसरातील शेतीचे आणि पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे.तरी मायबाप सरकारने पंचनामे आणि सोपस्काराला बगल देऊन शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी अशी मागणी या भागातील शेतकरी बांधवांनी केली आहे. तरी मायबाप सरकारने सर्व गोष्टी बाजूला ठेवून शेतकऱ्यांच्या बॅक खात्यामध्ये तातडीने मदत जमा करावी हिच आमची मागणी आहे असे या पंचक्रोशीतील हजारो शेतकरी बांधवांनी केली आहे.

## शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपयांची तात्काळ मदत द्या - बाजीराव ढाकणे यांची सरकारला मागणी



**आत्ताच एक्सप्रेस**

**बीड/ प्रतिनिधी/** बीड जिल्ह्यात मागील दहा दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, उभ्या पिकांचा पूर्णतः नाश झाला आहे. या पार्श्वभूमीवर महाएनजिओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्याचे बीड जिल्हा समन्वयक तथा सामाजिक कार्यकर्ते श्री बाजीराव ढाकणे यांनी बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी किमान १ लाख रुपयांची तात्काळ आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

**बीड जिल्ह्यात ओल्या दुष्काळाचे संकट**

पिकांचे अमाप नुकसान – शेतकरी हवालदिल

श्री बाजीराव ढाकणे यांनी सांगितले की, सोयाबीन, कापूस, मका, तुर, भुईमूग व भाजीपाला यांसारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून शेती केली होती; पण आता उभे पीक पूर्णपणे पाण्याखाली गेले आहे. शेतकरी हवालदिल झाला आहे. शासनाने अहवाल, पंचनामे व तपासण्यांच्या नावाखाली वेळ घालवू नये, तर तातडीने मदतीचा निर्णय घ्यावा.

**'आश्वासन नव्हे, प्रत्यक्ष कृती हवी'**

बाजीराव ढाकणे यांनी पुढे सांगितले, शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रू पाहा. केवळ आश्वासनांनी पोट भरत नाही. बीड जिल्ह्यातील सर्व तालुके ओला दुष्काळग्रस्त घोषित करून हेक्टरी १ लाख रुपयांची मदत थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली पाहिजे. दौरे व बैठकींपेक्षा प्रत्यक्ष कृती होणे आवश्यक आहे.

**पूरस्थितीमुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता**

बीड जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतजमिनी जलमय झाल्या असून पिकांचे झालेले नुकसान आणि आर्थिक संकटामुळे शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचले आहेत. अशा वेळी शासनाने तात्काळ उपाययोजना न केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होईल, असे मत श्री बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

**शेतकऱ्यांचा सरकारला इशारा**

जर तात्काळ मदत मिळाली नाही, तर शेतकऱ्यांचा रोष रस्त्यावर येईल, असा स्पष्ट इशारा श्री.बाजीराव ढाकणे यांनी सरकारला दिला आहे. शेतकऱ्यांचा आवाज आता रस्त्यावरूनच सरकारपर्यंत पोहोचवावा लागेल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

## राष्ट्रवादी (अजित पवार )गटाच्या ओबीसी सेलच्या केज ता.अध्यक्षपदी गोवींद ससाणे

**आत्ताच एक्सप्रेस**

**केज/ प्रतिनीधी/** सोनी जवळा गावचे सरपंच गोविंद ससाणे यांची राष्ट्रवादी (अजित पवार ) गटाच्या ओबीसी सेलच्या केज तालुका अध्यक्ष पदी राज्याचे उप मुख्यमंत्री मा. ना. अजित पवार यांच्या आदेशाने जेष्ठ नेते रमेश आडसकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच युवा नेतृत्व ऋषीकेश आडसकर यांच्या नेतृत्वा खाली ओबीसी सेलचे बीड जिल्हाध्यक्ष विजय धायगुडे यांच्या अध्यक्षते खाली निवड करण्यात आली. ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी निवड झाल्याच्या निमीत्ताने गावकर्यांकडून आयोजीत सत्कार समारंभात बोलताना श्री.मिनाज पटेल यांनी सांगितले कि या निवडीला जातीय चष्म्यातून न पाहता, अठरापगड जातींच्या समाजाला योग्य न्याय देण्याचे काम करून सर्वांच्या विकासाकडे लक्ष केंद्रीत करणार तसेच या निवडीमुळे सोनी जवळा गावची जिम्मेदारी वाढली असून सामाजिक ऐक्य टिकवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील असे अंबाजोगाई साखर कारखान्याचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य,मिनाज पटेल सर यांनी सांगितले.



यावेळी पुढे बोलताना ओबीसी सेलचे केज तालुकाध्यक्ष श्री गोविंद ससाणे यांनी आपले विचार मांडताना सांगितले कि, राज्याचे उपमुख्यमंत्री मा.ना.अजित पवार साहेबांच्या, राष्ट्रवादी पक्षाच्या ध्येय धोरणा प्रमाणे पुढील वाटचाल आमचे जेष्ठ नेते रमेशराव आडसकर साहेबांच्या,ज्यांनी मला पद दिले त्यांच्या मार्गदर्शनाखाली युवा नेतृत्व ऋषीकेश आडसकर यांच्या नेतृत्वा खाली, तसेच ओबीसी सेलचे बीड जिल्हाध्यक्ष विजय भागवतराव धायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली केली जाईल तसेच सध्या अतिवृष्ठी ने केज तालुक्याती शेतकऱ्यांचे आतोनात नुकसान झाले असून आमचे जेष्ठ नेते मा. रमेशराव आडसकर शेतकर्यांच्या बांधावर जावून प्रत्यक्ष नुकसानीची पहाणी करत आहेत नुकसानी चा लाभ शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहेत.

झालेल्या निवडीला जातीच्या चेष्म्यातून न पाहता, जातीय तेड निर्माण न करता, सामाजिक सलोखा अबाधित राखून अठरापगड जातींच्या नागरीकांच्या समस्या, अडचणी सोडवण्याचे काम करणार आहे .

## जीएसटी कपातीचे स्वागतच;यामुळे खरोखरच महागाई कमी होईल का? शेतकरी,गरीब व सर्वसामान्यांना दिलासा मिळेल का?

सरकार अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेत आहेत त्यात मुख्यत्वे करून जीएसटी कमी केल्याने अनेकांना लाभ अवश्य होईल यात दुमत नाही.परंतु जीएसटी सरकारनेच लावली होती आणि आता ती कमी केली म्हणजे काय केले? सर्वप्रथम जीएसटच्या माध्यमातून सरकारची तिजोरी भरली ही बाब ठीक आहे आणि आता जीएसट कमी केली म्हणजे महागाई कमी झाली किंवा सर्वसामान्यांचे जगणे सुसह्य झाले म्हणता येणार नाही. कारण जीएसटीचा संपूर्ण पैसा हा जनतेच्या खिशातून जात असतो. देशाच्या १४० कोटी जनतेला खरोखरच दिलासा द्यायचा असेल व जीवन सुसह्य करायचे असेल तर सर्वप्रथम केंद्र सरकारने व राज्य सरकारांनी महागाई कमी करने अत्यंत गरजेचे आहे.कारण देशात महागाई भस्मासुर दिवसेंदिवस वाढत आहे व यावर तोंडाला पाने पुसण्याचे काम अल्पसा पगार डीए (महागाई भत्ता) यामाध्यमातून वाढवून सरकारी कर्मचाऱ्यांकडुन सरकार आपली पाठ थोपटून घेते.याचा आयता फायदा राजकीय पुढाऱ्यांच्या पगारामध्ये व पेंशनमध्ये होतो.परंतु व्यापारीवर्ग व पुंजीपतीवर्ग महागाई वाढवून सरकारची नेहमीच दिशाभूल करीत असतो व याचा लाभ कर्मचाऱ्यांना न होता व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात होत असतो. याचे प्रायश्चित्त देशातील सर्वसामान्य,गरीब, शेतकरी,मोलमजुर यांना महागाईच्या रूपात नेहमीच भोगावे लागते आणि याची झळ आरोग्य,शिक्षण व जीवनावश्यक वस्तूंवर पडून याचे प्रायश्चित्त संपूर्ण कुटुंबाला वेगवेगळ्या रूपात भोगावी लागते. देशातील कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात जर १ टक्क्याने वाढ झाली असेल तर त्याचा व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात फायदा घेऊन संपूर्ण भारतामध्ये सर्वच वस्तूंवर २० टक्क्यांनी वाढ करतात.याचे प्रायश्चित्त शेतकऱ्यांसह सर्वसामान्यांना भोगावे लागते. कारण सरकारी कर्मचाऱ्यांची डीए वाढ सुध्दा नाहीच्या बरोबरीने असते. परंतु शेतकऱ्यांना व सर्वसामान्यांना याचा काहीच लाभ होत नाही हेही तितकेच सत्य आहे.त्यामुळे सरकारने महागाई कमी करण्यावर जास्तीत जास्त भर दिला पाहिजे. एकतर देशातील ९५ टक्के मुठभर आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांनी देशाचे वाटोळे करून करोडो रुपयांची मोठ्या प्रमाणात चलअचल संपत्ती डांबुन ठेवल्याने देशात महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी व शैक्षणिक समस्या इत्यादी अनेक समस्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तर दुसरीकडे देशातील भरमसाठ महागाई वाढल्याने याचे प्रायचिश्चित्त देशाची १४० कोटी जनतेला भोगावे लागते.त्यामुळे जीएसटीत कपात करून खुप काही मोठी कामगिरी केली असे म्हणता येणार नाही व जीएसटी बचत महोत्सव सुध्दा म्हणता येणार नाही.

देशातील राजकीय पुढारी जोपर्यंत सर्वसामान्यांनप्रमाणे वागणार नाही आणि रहाणार नाही तोपर्यंत देशाचा पायाभूत विकास संभव नाही.त्यामुळे सरकारने सर्वप्रथम आजी-माजी राजकीय पुढाऱ्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे, त्यांच्या संपत्तीवर टाच ठेवायला पाहिजे. तेव्हाच देश सुजलाम सुफलाम होईल. तेव्हाच खरा बचत महोत्सव म्हणावा लागेल व जनता सुध्दा त्याचे मनापासून स्वागत करेल.काही ठिकाणी सुधारणा होण्याची सुध्दा गरज आहे.कारण सरकारने सर्वप्रथम जीएसटी दर वाढविले आणि आता कमी केले यामुळे गरिब व सर्वसामान्यांना काय फायदा? यांचाही राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

सरकारने जीएसटी दर जर संतुलित ठेवला असता तर आज महागाईवर आपोआप नियंत्रण ठेवता आले असते.त्यामुळे आता जीएसटीमध्ये कपात करून महागाई कमी होईल असे मला वाटत नाही.आता जीएसटी महोत्सव आणि अगोदर जीएसटी वसुल केली त्याला कोणता महोत्सव म्हणावे! असाही प्रश्न सर्वसामान्यांनपुढे उपस्थित होतो.त्यामुळे हा महोत्सव नसुन प्रथम जास्त वसुल करने व नंतर त्याच्यात कमी करून स्वतःची पाठ थोपटने असेच म्हणावे लागेल. माननीय प्रधानमंत्री म्हणतात की, मी स्वदेशी खरेदी करतो, मी स्वदेशी विकतो ही भावना प्रत्येक देशवासीयांच्या मनात रूजली पाहिजे,तरच विकासाला गती मिळेल.राज्य सरकारांनी आत्मनिर्भर भारतआणि स्वदेशी मोहिमांना पाठबळ द्यावे.या वक्तव्याचे मनापासून स्वागतच आणि असेच व्हायला सुध्दा पाहिजे.देशात स्वदेशीचा नारा हा १९४७ पासुनच होता. परंतु पुंजीपतीवर्गांनी, हायप्रोफाइलमध्ये रहाणारे व राजकीय पुढारी यांनीच स्वदेशीच्या नाऱ्याला तिलांजली दिली व महागड्या विदेशी वस्तू खरेदी करण्यास सुरुवात केली व यावर जास्तीत जास्त भर दिला याला काय म्हणावे! आता आपण २१ व्या शतकात वावरत आहोत स्वदेशीचा वापर आपण जेव्हा म्हणतो तेव्हा याची सुरुवात देशातील आजी-माजी संपूर्ण राजकीय पुढाऱ्यांपासुनच व्हायला पाहिजे.कारण देशातील प्रत्येक पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी १४० कोटी जनतेला भाषणामध्ये ग्यान वाटत असतात.

देशातील प्रत्येक राजकीय पुढाऱ्यांनी दर महिन्याला जाहीर करायला पाहिजे की मी आणि माझ्या परिवारातील सदस्यांनी व कुटुंबीयांनी याऱ्या विदेशी वस्तूंचा त्याग केला व स्वदेशी वस्तूंचा वापर करायला सुरुवात केली आणि असे सांगायला विसरू नये की पुढे चालून कोणत्याही विदेशी वस्तूंचा वापर करणार नाही तेव्हाच स्वदेशी खरेदी-विक्रीला महत्व येईल व खऱ्या अर्थाने देशाची वाटचाल आत्मनिर्भर भारत होण्याच्या दिशेने वाटचाल करेल. कारण यामुळे देशातील स्वदेशीच्या वस्तूंना चालना मिळण्यास मोठी मदत होईल. आज देशातील शेतकऱ्यांच्या समस्या, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, बेरोजगारी, महागाई, महागडे शिक्षण,आरोग्य सुविधांच्या समस्या याला जबाबदार देशातील ९५ टक्के राजकीय पुढारीच आहे.आज देशातील १४० कोटी जनतेला कशाची आवश्यकता असेल तर फक्त आरोग्य व शिक्षण सुविधांची,सरकारला आरोग्याच्या दृष्टीकोनातून किंवा शिक्षणाच्या दृष्टीकोनातून कोणत्याही नवीन योजना आणण्याची गरज नाही.सरकारने जर आरोग्य सुविधा आणि शिक्षण सुविधा मोफत जर केले तर देशाची १४० कोटी जनता सरकारचे व राजकीय पुढाऱ्यांचे आभारी राहील.परंतु तसे होत नाही.कारण देशात सर्वांत जास्त खाजगी दवाखाने व शैक्षणिक संस्था ह्या राजकीय पुढाऱ्यांच्या किंवा पुंजीपती लोकांच्या आहेत.जय हिंद.

**-लेखक, रमेश कृष्णराव लांजेवार ( स्वतंत्र पत्रकार ), नागपूर.**

## दांडिया उत्सव म्हणजे महिलांच्या कलागुणांना वाव देणारे व्यासपीठ-अजय मुंडे

**आत्ताच एक्सप्रेस**

**परळी वैजनाथ (प्रतिनिधी)** दांडिया उत्सव हा महिलांच्या कलागुणांना वाव देणारा उत्सव आहे असे जिल्हा परिषदेचे गटनेते अजय मुंडे यांनी प्रतिपादन केले. महिलांनी आरोग्याची काळजी घेणे आवश्यक असल्याचे मत डॉ संतोष मुंडे यांनी व्यक्त केले. तर आजच्या काळात महिलांसाठी विविध उपक्रम राबविण्याची दांडिया महोत्सवातून गरज अधोरेखित होते असे बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले.

तेली समाज सार्वजनिक दांडिया महोत्सवा च्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

येथील तेली समाजाच्या वतीने सार्वजनिक दांडिया महोत्सवाचे आयोजन श्री शनी मंदिरात करण्यात आले असून या दांडिया महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते श्री शनी देव व तुळजाभवानी देवीची आरती करण्यात आली.

यानंतर युवानेते अजय मुंडे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून दांडिया महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांचा तेली समाज सार्वजनिक दांडिया उत्सव समितीच्या वतीने पुष्पहार, शाल देऊन सत्कार करण्यात आला.




यावेळी अजय मुंडे यांनी सर्व महिला भगिनींना नवरात्रोत्सवाच्या शुभेच्छा देत पवन फुटके यांनी समाजासाठी काहीतरी करावे या हेतूने हा दांडिया महोत्सव सुरू केला तो स्तुत्य उपक्रम आहे. तर डॉ संतोष मुंडे यांनी महिलांच्या आरोग्याबद्दल बोलत असताना सांगितले की, येथे महिलांसाठी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

सर्व महिलांनी तपासणी करुन घ्यावी. कार्यक्रमास जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, दिव्यांनी कल्याण मंत्रालयाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे, माजी नगराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, कोलूघाणा सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष सुरेश लांडगे, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे सचिव प्रा मधुकर शिंदे, छगन आप्पा क्षीरसागर, तुळशीदास सालमोटे, अशोक बेंडे यांच्यासह दांडिया उत्सव समितीचे अध्यक्ष पवन फुटके, सोमनाथ वाघमारे, अशोक रोकडे, संदेश क्षीरसागर, राजकुमार भाग्यवंत, मोहन राजमाने, शिवशंकर जठार, मल्लिकार्जुन साखरे, रवी अन्नपूर्णे, गजानन बेंडे, ईश्वर राऊत, सचिन लासे, प्रसाद जठार,प्रदीप पिंपळे, ओमकार नाईक, शंकर कौले, ओमकुमार सोनटक्के आदि पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमाला समाजातील मान्यवर, महिला व तरुणांचा मोठा उत्स्फूर्त सहभाग लाभला. रंगतदार दांडियाच्या तालावर वातावरण उत्साहाने भरून गेले.

# सशक्त समाज निर्मितीत महिलांची भुमिका मोलाची- जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** समाजाची प्रगती होत असतांना हा समाज वैचारीक, सांपत्तिक आणि आरोग्यदृष्ट्या सशक्त असणे आवश्यक असते.कुटुंब सांभाळणारी महिला संस्कार करुन आपले कुटूंब आणि पर्यायाने समाज सशक्त बनवत असते, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज केले.दश-सूत्री कार्यक्रमांतर्गत 'जागर स्त्रीशक्तीचा' या उपक्रमांतर्गत महिला शिक्षकांसाठी विशेष संवाद कार्यशाळेचे आयोजन आज करण्यात आले. छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या इंजिनिअरींग महाविद्यालयाच्या सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. जिल्हा



शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जयश्री चव्हाण व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अश्विनी लाठकर आदी मान्यवर उपस्थित होते.आपल्या संबोधनात जिल्हाधिकारी स्वामी म्हणाले की, वाचनाने माणूस प्रगल्भ होतो, विचाराने धनवान होतो आणि आरोग्य व संस्कार हे जीवनाचे अविभाज्य अंग आहेत. शिक्षणासोबत वैचारिक प्रगल्भता महत्वाची. नवदुर्गा व त्यांचे माहात्म्य हे आजच्या स्त्री मध्येही आहे. त्यामुळेच आपण सशक्त समाजनिर्मितीत करु शकता,असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाची सुरुवात महिला शिक्षकांच्या आरोग्य तपासणीने झाली. या कार्यशाळेसाठी छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा, तसेच खाजगी अनुदानित शाळांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व महिला शिक्षकांची उप-स्थिती होती. यावेळी राज्य पुरस्कार विजेत्या शिक्षकांचा प्रातिनिधिक स्वरूपात सन्मान करण्यात आला. प्रास्ताविक प्रभारी गटशिक्षणाधिकारी मनीषा वाशिंबे यांनी केले. सुत्रसंचालन विस्तार अधिकारी कल्पना पदकोंडे यांनी केले. आभार प्रदर्शन विस्तार अधिकारी धनराज कांबळे यांनी केले.

# इमाव बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे शेतकऱ्यांच्या बांधावर

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** वीरगाव तसेच भग्गाव, कापूस वडगाव ता. वैजापूर या परिसरात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, अपारंपरिक उर्जा, दुग्धविकास, दिव्यांग कल्याण विभागाचे मंत्री अतुल सावे हे आज थेट शेतकऱ्याच्या बांधावर गेले. शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी यासाठी प्रशासनास पंचनामे करण्याचे निर्देश दिले.

उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, तहसिलदार सुनिल सावंत, तलुक कृषी अधिकारी



व्यंकट ठक्के, गटविकास अधिकारी श्रीकृष्ण वेणीकर तसेच ग्राम महसूल अधिकारी ,ग्रामपंचायत अधिकारी तसेच सहाय्यक कृषी अधिकारी तसेच तहसिलदार,तालुका कृषी अधिकारी आणि गट विकास अधिकारी व सर्व विभागांचे प्रमुख होते

मंत्री अतुल सावे यांनी आज वैजापूर तालुक्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्याचे प्रशास-नाला निर्देश दिले.

वीरगाव परिसरात मका पिकाचे मोठे नुकसान झाले असून भग्गाव परिसरात सोयाबीन, ऊस पिकाचे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनातर्फे भरीव मदत देण्याची ग्वाही श्री. सावे यांनी यावेळी दिली.

तसेच शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचा दिलासाही दिला. यावेळी स्थानिक शेतकरी अधिकारी उप-स्थित होते.

# वित्तीय साक्षरता मेळावा तसेच आर केवायसी मेळावा संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**देगलूर / प्रतिनिधी** / महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत व क्रिसील फाउंडेशन यांच्या माध्यमातून देगलूर तालुक्यातील खुतमापूर येथे वित्तीय साक्षरता मेळावा तसेच केवायसी मेळावा घेण्यात आला. बचत गटातील महिला सीआरपी उपस्थित होते. लक्ष्मीताई दत्ता ठाकूर आणि वंदना वाघमारे तसेच गा-




वातील सरपंच बालाजी चोपडे हे उपस्थित होते. आणि सर्व बचत गटातील महिला उपस्थित होते. तरी सर्व महिलांना बँकेविषयी आर केवायसी, प्रधानमंत्री सुरक्षा विमा,जीवन ज्योती विमा, अटल पेन्शन,डिजिटल व्यवहार, तक्रार निवारण प्रणाली,बँक,लोन,शासकीय योजनांची माहिती क्रिसिल फाउंडेशनच्या संगीता ताई वाघमारे यांनी सविस्तर माहिती दिली.

# माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांचे अंजना नदीच्या फुलावर जल आंदोलन

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड / प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील कोळंबी भारंबा रस्त्यावरील अपूर्ण पुलाचे काम तातडीने पूर्ण करावे, या मागणीसाठी माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी बुधवारी सकाळी दहा वाजल्यापासून पुलाच्या मध्यभागी ठिय्या आंदोलन सुरू केले. विशेष म्हणजे हे आंदोलन वाहत्या पाण्यात सुरू असून, त्यांच्या सोबत अनेक कार्यकर्ते देखील पाण्यात बसले आहेत. जोपर्यंत या पुलाचा प्रश्न मार्गी लागत नाही किंवा ठोस आश्वासन मिळत नाही, तोपर्यंत आम्ही आंदोलन मागे घेणार नाही, असा इशारा माजी आमदार जाधव यांनी दिला.या रस्त्यावरून दूध उत्प-ादक शेतकरी सकाळ-संध्याकाळ ये-जा करीत असतात. तसेच कोळंबी, भारंबा, भारंबा तांडा, गोकुळवाडी, पळशी बुद्रुक, पळशी खुर्द, जैतखेडा आदी गावांतील ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने या मार्गावरून प्रवास करतात. मात्र, अंजनानदीला गेल्या आठ दिवसांत तिसऱ्यांदा आलेल्या महापुरामुळे तांडा भारंबा, कोळंबी माळेगाब आदी गा-वातील गावकर्यांना तसेच विद्यार्थ्यांच्या पिशोर येथील गावासोबत संपर्क तुटला आहे पिशोर परिसरात विध्यार्थ्यांना शिक्षणासाठी येणे जाणे बंद झाल्यामुळे शिक्षणाचा बट्ट्याबोळ झाला आहे. कॉन्ट्रॅक्टरने उभारलेला पर्यायी रस्ता अलीकडील जोरदार पावसामुळे वाहून गेला असून सध्या दोन्ही बाजूंचा संपर्क तुटला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून या पुलाचे काम प्रलंबित आहे. काही दिवसांपूर्वी



या बांधकामावरून वाद उद्भवला होता, त्यामुळे हे काम कधी पूर्ण होईल याबाबत ग्रामस्थांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. परिणामी, ग्रामस्थांनी हे काम तातडीने पूर्ण करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

आंदोलनस्थळी सकाळपासून पो-लीस व होमगार्ड तैनात होते. महसूल विभागामार्फत मंडळ अधिकारी ए.के. पट्रे, तलाठी एन.एन. गवळी, एस.डी. बिसपुते, सचिन मोरे, कोतवाल हरून शेख, रशीद शेख आदी उपस्थित होते. मात्र महसूल प्रशासनाकडून कोणताही ठोस निर्णय जाहीर करण्यात आला नाही. दरम्यान, इंजिनीयर जालिंदर सोनवणे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न झाला परंतु त्यांचा फोन बंद होता. तसेच कॉन्ट्रॅक्टर सचिन आतसरे यांच्याशीही संपर्क साधता आला नाही.दरम्यान, माजी आमदार हर्षवर्धन जाधव यांनी प्रशासनावर संताप व्यक्त करताना म्हटले की, तीन दिवसांपासून दूध उत्प-ादक शेतकरी या पुलावरून दोर धरून दूध आणत आहेत. सायंकाळी पाऊस पडल्यास अंजनानदीला पुन्हा पूर येऊ शकतो. आम्ही पुरात वाहून जावे, अशीच प्रशासनाची वाट पाहत आहे काय? असा ज्वलंत सवाल त्यांनी समाजमाध्यमातून उपस्थित केला.

# वैजापुरात मुसळधार पावसाने घराची भिंत कोसळली एक जण जखमी

**आत्ताच एक्सप्रेस**

**वैजापूर /सुयोग वाणी /** वैजापूर शहर व तालुक्यात गेल्या चार-पाच दिवसापासून मुसळ-धार पाऊस सुरू आहे.मुसळधार पावसामुळे घराची भिंत कोसळून एक जण ढिगाऱ्याखाली दबल्याने जखमी झाल्याची घटना वैजापूर शहरातील महाराणा प्रताप रोड,(मढीजवळ) मंगळवारी पहाटे चार वाजेच्या सुमारास घडली. या घटनेत अय्युब इब्राहिम शेख वय (४०)असे जखमी झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. शेख हे आपल्या परिवारासह सोमवारी रात्री गाढ झोपेत असताना मुसळधार पावसामुळे घराची भिंत अचानक कोसळली. सुदैवाने या घटनेत कुठलीही जीवितहानी झाली नाही. या घटनेची माहिती मिळताच माजी नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी यांनी घटनास्थळी भेट देऊन जखमी झालेल्या अय्युब शेख व त्यांच्या परिवाराला धीर देत हवी ती मदत करणार असल्याचे सांगितले.

वैजापूर नगर पालिकेचे मुख्याधिकारी भागवत बिघोत, तहसीलचे मंडळाधिकारी जितेंद्र चापानेरकर, तलाठी गजानन जाधव यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

**साबेर पठाण सहकाऱ्यांसह धावले मदतीला**

भिंत कोसळल्याने जखमी झालेले अय्युब शेख यांच्या मदतीसाठी घराशेजारीच राहत असलेले भारतीय जनता पक्षाचे अल्पसंख्यांक शहराध्यक्ष साबेर पठाण,जुबेर शेख अरबाज शेख, मोहसीन शेख, हरून शेख हे तरुण तात्काळ धावून गेले. विटा व मातीच्या ढिगाराखाली



अडकलेल्या शेख यांना बाहेर काढून वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात त्यांनी उपचारासाठी दाखल केले. संकटात केलेले या मदतीमुळे साबेर पठाण त्यांच्या सहकाऱ्यांचे शहरा-तील नागरिकांमधून कौतुक होत आहे. माणुसकी आजही जिवंत असल्याचे हे उत्तम उदाहरण आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

# ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना भरघोस मदत द्यावी-आमदार सौ.संजना जाधव

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/उदय कुलकर्णी/** मराठवाड्यासह कन्नड- सोयगाव तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सततच्या झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेली पिके पूर्णपणे उध्वस्त झाली असून शेतकरी राजा पूर्णपणे उध्वस्त झाला आहे. या पडलेल्या पावसाने मुक्या जनावरांचे चारे, पशु-धनाची हानी तसेच घरांचेही नुकसान झाले आहे. तसेच नदीकाठच्या जमिनी देखील खरडून वाहून गेल्याने शेतकऱ्यांच्या कुटुंबियांत चिंता व नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे.याच पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे व कृषिमंत्री ना.दत्तात्रय भरणे यांची आमदार सौ. संजनाताई जाधवांनी भेट घेऊन मराठवाड्या सह



कन्नड- सोयगाव मतदार संघ ओला दुष्काळ म्हणून जाहीर करावा व शेतकरी बांधवांना भरघोस आर्थिक मदतीचा हात द्यावा म्हणून निवेदनाद्वारे मागणी केली आहे.या केलेल्या मागणीला उपमुख्यमंत्री ना.एकनाथरावजी शिंदे व कृषिमंत्री ना.दत्तात्रय भरनेंनी सकारात्मकता प्रतिसाद दाखवून शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी शासना कडुन पुढील योग्य तो निर्णय तात्काळ घेतला जाईल असे आश्वासित केले आहे.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी; तालुका कॉंग्रेस कमिटीची मागणी, तहसीलदारांना निवेदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद / प्रतिनिधी /** खुलताबाद-तालुक्यात सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी,यासाठी कॉंग्रेस पक्षाचे तालुका अध्यक्ष अँड अनिल नलावडे यांच्या नेतृत्वाखाली खुलताबाद तालुका कॉंग्रेस कमिटीच्या वतीने बुधवारी (दी.२४) तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.या वेळी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की मागील काही दिवसांतील मुसळ-धार पावसामुळे ऊस,कापूस,सोयाबीन, मका,बाजरी, कांदा, तुर,फळबाग याच्या सह खरीप हंगामातील जवळपास सर्व पिके पूर्णपणे वाहून गेली आहेत.इतकेच नव्हे तर मोठ्या प्रमाणात सुपीक मातीही वाहून गेल्याने शेतीच उद्धुस्त झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हाता- तोंडाशी आलेला घास अक्षरशः हिरावला गेला आहे.शेतकऱ्यांना हमीभाव मिळत नाही, कर्जमाफी मिळत नाही, पिकविमा मिळत नाही अशा दुहेरी ताणाखाली असतानाच अतिवृष्टीने उरलेसुरले आशेचे पीकही नेस्तनाबूत केले आहे.यामुळे शेतकरी बांधव अत्यंत हवालदिल झाले आ-हेत. तरीसुद्धा प्रशासन व शासन पंचनामा करण्यास वेळकाढूपणा करीत असल्याचा आरोप करण्यात आला.

शेतकऱ्यांना तातडीने सरसकट हेक्टरी किमान ५० हजार रुपये नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी कॉंग्रेस कमिटीच्या



वतीने करण्यात आली आहे . दसरा सणाअगोदर नुकसानभरपाई न दिल्यास शेतकऱ्यांसह तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनाद्वारे तहसीलदारांना गाव निहाय पंचनामे करण्याचे आदेश तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना द्या-वेत व शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी, अशी विनंती कॉंग्रेस कमिटीच्या वतीने करण्यात आली.याकडे शासन व प्रशास-नाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

या निवेदनावर तालुका अध्यक्ष अनिल नलावडे.अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष मसियोद्दीन अलाउद्दीन, अब्दुल मजीद मणियार, शेख अहेमद,शहराध्यक्ष अब्दुल समद, उपाध्यक्ष शेख इक्रामोद्दीन, पांडूरंग वेताळ, शेख अहमद,मदन राठोड यांच्यासह आधीच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# संक्षिप्त

## धर्मादाय सह आयुक्त कार्यालयातर्फे 'नमो नेत्र स्वास्थ संजीवनी अभियान'

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त राज्यभरात दि.१७ सप्टेंबर ते दि.२ ऑक्टोबर या कालावधीत 'नमो नेत्र स्वास्थ संजीवनी अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाचे आयोजन मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष व धर्मादाय सह आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर तसेच धर्मादाय रुग्णालय मदत कक्षातर्फे करण्यात आले आहे. या अभियानांतर्गत भटक्या जमाती वस्ती, दलित वस्ती, जनजाती क्षेत्रे तसेच समाजातील दुर्बल घटकांच्या वस्त्यांमध्ये विशेष नेत्र-स्वास्थ्य सेवा पुरविली जाणार आहे. यामध्ये नेत्र तपासणी, औषधोपचार, मोफत शस्त्रक्रिया, चष्मे वाटप, अंधकाठी वाटप तसेच नेत्रदानाविषयी जनजागृती केली जाणार आहे. जिल्ह्यातील धर्मादाय रुग्णालये व विविध स्वयंसेवी संस्था, विभाग यांच्या सहकार्याने शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून गरजू नागरिकांनी या शिबिरांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच नेत्रविषयक कंझ्युमेबल्स, इम्प्लांट्स, औषधे किंवा आर्थिक स्वरूपातील मदतीसाठी सेवाभावी संस्था व दाते यांनी पुढे यावे, असे आवाहन धर्मादाय सह आयुक्त राजेश पावसकर यांनी केले आहे.

## इमाव विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी वसतीगृह; प्रवेश प्रक्रिया सुरु

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह प्रवेशासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना वसतीगृह प्रवेश मिळू शकत नाही अशांसाठी पंडीत दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी अर्ज मागविण्याचे वेळा पत्रक निश्चित झाले आहे, असे सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण दत्तात्रय वाघ यांनी कळविले आहे.

अर्ज करण्याची पद्धती व वेळापत्रकः-इच्छुक अर्जदारांनी https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर अर्ज करावयाचा आहे. त्यासाठी १२ वी नंतर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले तसेच पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले (बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम वगळून) विद्यार्थ्यांनी दि.१९ ते २९ सप्टेंबर या कालावधीत अर्ज करावा. अर्ज छाननी दि.३० सप्टेंबर ते ८ ऑक्टोबर या कालावधीत होईल. पहिली निवड यादी दि. ६ऑक्टोंबर रोजी प्रसिद्ध होईल. त्यानुसार दि.१६ ऑक्टोंबर पर्यंत प्रवेशासाठी अंतिम मुदत असेल. तर रिक्त जागेवर प्रवेशासाठी दुसरी यादी दि.१७ ऑक्टोंबर रोजी प्रसिद्ध होईल. दुसऱ्या निवड यादीतील प्रवेशासाठी दि.३१ऑक्टोंबर ही अंतिम मुदत असेल.

## कौशल्य, विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचा उपक्रम

झटपट नोकरीसाठी आज 'जागेवर निवड संधी' विशेष मोहिम

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** जिल्हा कौशल्य, विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर यांच्यातर्फे 'जागेवर निवड संधी' (प्लेसमेंट ड्राईव्ह) चे गुरुवार दि.२५ रोजी आयोजन करण्यात आले आहे. विभागाच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयातच हा उपक्रम राबविला जाणार असून इच्छुक तरुण तरुणींनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सहायक आयुक्त यांनी केले आहे.जिल्हा कौशल्य, विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातच गुरुवार दि.२५ रोजी सकाळी साडेनू ते दुपारी २ यावेळात थेट मुलाखती घेतल्या जातील. जिल्ह्यातील युवक युवतींना विविध खाजगी कंपन्या, कारखाने उद्योग व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडी रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू आहे. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित विविध कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून १२८ रिक्तपदांकरीता मुलाखती घेणार आहेत. यासाठी शैक्षणीक पात्रता १० वी, १२ वी, आयटीआय पास, डिप्लोमा व कोणत्याही शाखेचा पदवीधर अशा पात्रतेच्या जिल्ह्यातील युवक-युवतींसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.या मोहिमेत सहभागी होण्यासाठी विभागाच्या www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध रिक्तपदांना एम्प्लॉयमेंट नोंदणी असलेल्या उमेदवारांनी युजरआयडी व पासवर्ड ने लॉग इन होऊन ऑनलाईन अप्लाय करावे किंवा बायोडाटाच्या ६ प्रती घेऊन प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.संकेतस्थळावर नोंदणी करताना अथवा रिक्तपदासाठी अप्लाय करताना काही अडचण आल्यास कार्यालयाच्या दुरध्वनी क्रमांक ०२४०-२९५४८५९ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त रोजगार इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहून पात्रतेप्रमाणे विविध नियोक्त्यांकडे मुलाखती देवून रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे.

# जालना जिल्ह्यातील बदनापूर व अंबड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची कृषी मंत्री दत्तात्रय भरणेंकडून पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ जालना जिल्ह्यात प्राथमिक स्वरूपात २ लाख ५४ हजार एकर क्षेत्राचं नुकसान झालं आहे. तर, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये प्राथमिक अंदाजानुसार राज्यात ३३ लाख ५१ हजार १७५ हेक्टर म्हणजे ८३ लाख ७७ हजार ९३७ एकर क्षेत्र बाधित आहे. सप्टेंबर महिन्यात जास्त पाऊस पडला आहे. सप्टेंबर पूर्वीचा विचार केला तर नुकसान थोडं कमी होतं. कृषी विभाग आणि महसूल विभागाकडून पंचनाम्याचं काम युद्ध पातळीवर सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील आज नुकसानग्रस्त भागांची पाहणी करत आहेत त्यामुळे त्यांचं सर्व परिस्थितीवर बारकाईनं लक्ष आहे. लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज जालना जिल्ह्यातील बदनापूर व अंबड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली. सलग पडत असलेल्या पावसामुळं शेतकऱ्यांच्या पिकांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं असून, शेतकरी अडचणीत सापडला आहेत. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन मंत्री दत्तात्रय भरणे यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. पाहणीदरम्यान मंत्री भरणे यांनी अधिकाऱ्यांना थेट दूरध्वनीवरून सूचनादेखील दिल्या आणि काही ठिकाणी कामकाजातील सुस्तगतीबाबत नाराजी व्यक्त केली.

पाहणी दरम्यान शेतकऱ्यांनी सोयाबीन, कपाशी, तूर यांसारख्या पिकांचे नुकसान, जमिनीवर पाणी साचल्याने उभ्या पिकांची झालेली हानी, रस्ते व पायाभूत सुविधांवर झालेला परिणाम याबाबत कृषी मंत्री भरणेंना माहिती दिली. यावर गांभीर्यानं लक्ष देत मंत्री भरणे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ फोन लावून, एकही शेतकरी पंचनाम्यात वंचित नाही राहिला पाहिजे. नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याचा पंचनामा करण्यात यावा. शेती, गुरं, विहिरी या सर्व गोष्टींचे पंचनामे करा, असे आदेश मंत्री दत्तात्रय भरणे यांनी अधिकाऱ्यांना दिले.

मंत्री भरणे म्हणाले की, शेतकऱ्यांना न्याय मिळावा ही राज्य शासनाची प्राथमिकता आहे. कुठल्याही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवलं जाणार नाही. ज्याचं नुकसान झालं, त्यांचं सगळं नुकसान नोंदवून घ्या. मी तुम्हाला मंत्री म्हणून सांगतो, शेतकऱ्याच्या एक गुंठ्याचा पंचनामा जरी राहिला तर त्याला तुम्ही जबाबदार असाल, असा इशारा त्यांनी अधिकाऱ्याला दिला. शेतकरी खूप अडचणीत आहे. तो वंचित राहणार नाही याची काळजी घ्या. असेही त्यांनी बजावले.



जालना जिल्ह्यात माहे ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे एकूण २ लाख ५५ हजार ३५१ हेक्टर म्हणजेच ६ लाख ३८ हजार ३७७ एकर क्षेत्र बाधित झालं आहे. यात फक्त सप्टेंबर महिन्यातच २ लाख ४७ हजार ५४१ हेक्टर क्षेत्र बाधित झालं आहे. राज्याचा विचार करता, ऑगस्ट व सप्टेंबरमध्ये प्राथमिक अंदाजानुसार ३३ लाख ५१ हजार १७५ हेक्टर म्हणजे ८३ लाख ७७ हजार ९३७ एकर बाधित क्षेत्र आहे. या अतिवृष्टीमुळे खरीप पिकांचं मोठं नुकसान झालं असून प्रामुख्यानं सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, ज्वारी, भाजीपाला, फळपिके, मका, इत्यादी पिकांचं नुकसान झालं आहे.

## जिल्ह्यात यलो अलर्ट

# सोसाट्याचा वारा,पावसाची शक्यता दक्षता घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, कुलाबा, मुंबई यांनी दिलेल्या सूचनेनुसार जालना जिल्हयात दि. २४ सप्टेंबर व २६ सप्टेंबर २०२५ ते दि. २८ सप्टेंबर २०२५ या कालावधीत यलो (Yellow) अलर्ट जारी केला असुन तुरळक ठिकाणी विजेच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा (ताशी ३०-४० कि.मी.प्र.ता. वेगाने) हलका ते मध्यम स्वरुपाची पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. तसेच दि. २५ सप्टेंबर २०२५ रोजी हलका ते मध्यम व दि.२८ सप्टेंबर २०२५ रोजी तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनातर्फे जिल्ह्यातील नागरीकांना खालीलप्रमाणे दक्षता घेणेबाबत आवाहन करण्यात येत आहे.

मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा, धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे,मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत/दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रॉन्सफोर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अर्थातरी लटकणा-या / लोंबणा-या तारांपासून दूर रहावे.वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.अवकाळी पाऊस व गारपीटीमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी बांधवांनी वेळीच नियोजन करावे. शेतकऱ्यांनी शेतमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीमध्ये शेतमाल विक्रीसाठी आणला असेल किंवा त्याप्रमाणे नियोजन केले असेल, तर सदर मालाचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी,जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे.

सर्व नागरीकांनी वादळी वारे, वीज पासून स्वतः सह जनावरांचे संरक्षण होईल याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी, आपत्कालीन परिस्थितीत जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना ०२४८२-२२३१३२ वर तसेच नजीकचे तहसील कार्यालय, पोलीस स्टेशन यांचेशी संपर्क साधाण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## नेतृत्वगुण व व्यक्तिमत्त्व विकासासाठी रोटरी रेनबोचे रायला युवक प्रशिक्षण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/युवकांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास आणि नेतृत्वगुणांना चालना देण्यासाठी रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे जेईएस महाविद्यालयात मंगळवार दि. २३ सप्टेंबर रोजी रोटरी रेनबो रायला म्हणजेच रोटरी युथ लीडरशिप अवार्ड या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दिवसभर चाललेल्या या उपक्रमात विविध विषयांवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.

युवकांना संवादकौशल्य, गटचर्चा, वक्तृत्व, मुलाखत तंत्र, समाजमाध्यमांचा योग्य वापर, भावनिक बुद्ध्यांक, समस्यांचे निराकरण यांसारख्या विषयांवर प्रशिक्षण देऊन त्यांना उद्याचे जबाबदार नागरिक बनविण्यासाठी रायला या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. व्यासपीठावर जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, जालना एज्युकेशन सोसायटीचे सचिव श्रीनिवास भक्कड, रोटरीचे माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, संजय राठी, श्रीगोपाल मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविकपर भाषणात रोटरी रेनबोच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत यांनी रायला उपक्रमाचे महत्त्व स्पष्ट केले. त्या म्हणाल्या की, हा रोटरी इंटरनॅशनलचा युवकांसाठीचा विशेष उपक्रम आहे. युवकांमध्ये नेतृत्वगुण, आत्मविश्वास, व्यक्तिमत्त्व विकास घडविणे हा उद्देश असून, जगभरात रोटरी क्लबतर्फे या उपक्रमाचे आयोजन केले जाते. डॉ. सुरेश साबू यांनी या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये होणाऱ्या सकारात्मक बदलांचा ऊहापोह केला तर प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी युवकांना नेतृत्वकौशल्य आत्मसात करण्याचे आवाहन केले. मार्गदर्शन सत्रात महेश माळी यांनी भावनिक बुद्ध्यांक, विकास कदम यांनी नेतृत्व विकास कौशल्य, सौ. स्मिता भक्कड यांनी मुलाखतीची तंत्रे तर डॉ. नितीन खंडेलवाल यांनी समाजमाध्यमांचा योग्य वापर याविषयी उपयुक्त मार्गदर्शन केले.

## जवाहर नवोदय विद्यालयात ऑनलाईन अर्ज भरण्यास मुदतवाढ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/जवाहर नवोदय विद्यालय अंबा-परतूर लॅटरल एन्ट्री निवड चाचणी वर्ग ९ वी आणि वर्ग ११ वी करिता जालना जिल्ह्यातील इयत्ता ८ वी आणि १० वी वर्गात शैक्षणिक वर्ष सन २०२५-२६ मध्ये शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांसह सेवाकेंद्रावरून व इतर यंत्रणेचा वापर करून ऑनलाईन अर्ज भरण्याची शेवटची तारीख २३ सप्टेंबर २०२५ अशी होती. प्रशासकीय कारणास्तव ही मुदत वाढवून दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत करण्यात आलेली आहे.

तरी इच्छुक विद्यार्थी,पालक,शिक्षक व मुख्याध्यापकांनी ह्याची नोंद घ्यावी.ऑनलाईन फॉर्म भरण्यासाठी फोटो, स्वाक्षऱ्या हे १० ते १०० घइ मध्ये स्कॅन करून वर्ग नववी साठी https://cbseitms.nic/2025/nvsix 9 या संकेतस्थळावरून व अकरावी साठी https://cbseitms.nic/2025/nvsxi 11 या संकेतस्थळावरून भरावेत.जिल्हाभरातील सर्व मुख्याध्यापकांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्याचे अर्ज भरण्याचे आवाहन जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस.जी.पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

## खासदार डॉ. कल्याण काळे यांनी काढला चिखलातून मार्ग आणि साधला शेतकर्यांशी संवाद; अतिवृष्टीग्रस्त भागाची केली पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ जालना जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकर्यांचं मोठ्या प्रमाणावर नुकसान झालंय. या पार्श्वभूमीवर जालना लोकसभेचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी बुधवार दि. २४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळ पासून बदनापूर व अंबड आणि जालना तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त भागाची पाहणी केली. शेतकर्यांच्या बांधावर जाण्यासाठी खा. डॉ. कल्याण काळे यांना चिखल तुडवित मार्ग काढावा लागला. अखेर शेतकर्यांच्या नुकसानग्रस्त शेतीमध्ये जावून काळे यांनी शेतकर्यांशी संवाद साधला.बदनापूर तालुक्यातील तळणी, वाकूळणी तसेच अंबड तालुक्यातील मठ जळगाव, बनटाकळी आणि जालना तालुक्यातील गोलापांगरी यासह विविध गावातील शेतात आणि परिसरात जावून त्यांनी प्रत्यक्ष शेतकर्यांची व्यथा जाणून घेतली. पिकांचे मोठ्या प्रमाणावर झालेले



नुकसान पाहता तात्काळ पंचनामा करून शेतकर्यांना त्वरित मदत मिळावी, अशा सूचना महसूल विभागाला डॉ. काळे यांनी दिल्या.या पाहणीवेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, राजेंद्र राख,बदनापूर तालुका अध्यक्ष लक्ष्मण म्हसलेकर, जयप्रकाश चव्हाण, राष्ट्रवादी काँग्रेसचे राम सिरसाठ, भानुदास घुगे, कल्याण तारडे, दिनेश काकडे, बप्पासाहेब डोखळे, हनुमान धांडे, रामेश्वर फंड, जयसिंग राजपुत, सुभाष काटकर, विनायक आबा कोळकर, सुदाम काळे, तुकाराम संत, बंडु पागिरे,कृष्णा पाटील पडुळ, सोपान तिरूखे, माऊली इंगोले तसेच शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची तीव्रता लक्षात घेता शेतकर्यांना त्वरित आर्थिक मदत व दिलासा मिळणे आवश्यक असल्याचे डॉ. काळे यांनी स्पष्ट केले.

# जालना तालुक्यात अतिवृष्टीने मोठे नुकसान तात्काळ पंचनामे करावे - भास्कर आबा दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/जालना तालुक्यात मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकरी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संकटात आले आहेत. या अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असून रस्ते, पूल आणि शेतीसाठी महत्त्वाचे मार्ग वाहून गेले आहेत. तसेच काही भागात मुक्या जनावरांचीही जीवित हानी झाली आहे.भाजपा जालना महानगराचे जिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील दानवे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पत्राद्वारे तात्काळ मदत देण्याची मागणी केली आहे. पत्रामध्ये त्यांनी सांगितले आहे की, तालुक्यातील प्रत्येक मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांनी आपल्या स्तरावर तात्काळ पंचनामे करावे. तसेच, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासन स्तरावर योग्य ती मदत मिळावी व त्यांना दिलासा दिला जावा. अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान जास्त वेळ न गवसता



लवकरात लवकर भरून काढले पाहिजे. शासन आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्वरित पंचनामे करावेत, या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील अनेक गावांमध्ये पिकांचे नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे.यावेळी तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, विष्णू बापू डोंगरे, विजय मोहिते, गोवर्धन कोल्हे, नागेश अंभोरे, राजाराम जाधव, माऊली उगले, विलास मोहिते, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## संक्षिप्त

### मंत्री मंगलप्रभात लोढा यांचा २६ सप्टेंबर २०२५ रोजी जालना जिल्हा दौरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा हे जालना जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असुन त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीप्रमाणे दुपारी १.५५ वाजता हुतात्मा जनार्धन मामा नागापूरकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे आगमन. दुपारी २.०० वाजता इन्क्युबेशन सेंटरच्या उद्घाटनास मुख्य अतिथी म्हणुन उपस्थिती. दुपारी ३.०० वाजता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथील जागेवर झालेल्या अतिक्रमण विषया संदर्भात बैठक दुपारी ३.३० वाजता शॉर्ट टर्म कोर्सबाबत जालना जि.व्य.शि.प्र. विभागाची बैठक. सायंकाळी ४.०० वाजता जालना येथून छत्रपतीसंभाजीनगरकडे प्रयाण.

### मॅजिक आयटीआय जालना इनक्युबेशन सेंटर चे २६ सप्टेंबर रोजी उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/जिल्ह्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील विद्यार्थी तसेच नवउद्योजकांमध्ये नाविन्य व उद्योजकता वृद्धीसाठी, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १६ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे च-ऋखउ (चरीरींहुरवर -ललशश्रशीरीं षी र्त्रींह रपव खपर्लीलरींळेप ऊेंपलळश्र), छत्रपती संभाजीनगर यांच्याव्दारे इनक्युबेशन सेंटर स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्या अनुषंगाने, सदर इमारतीच्या पहिल्या मजल्यावरील को-वर्किंग व कार्यालयीन जागेचे नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले असून प्रत्यक्ष कामकाज सुरू होण्याच्या मार्गावर आहे.या अनुषंगाने, गुरुवार, दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १.३० वाजता कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्री, मंगल प्रभात लोढा, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत मॅजिक आयटीआय जालना इनक्युबेशन सेंटर या केंद्राचा उद्घाटन समारंभ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जालना येथे आयोजित करण्यात आला आहे.मॅजिक आयटीआय जालना इनक्युबेशन सेंटर च्या स्थापनेमुळे नवीन उद्योग उभारणीसाठी आवश्यक मार्गदर्शन,प्रशिक्षण व सुविधा मिळणार असून, नवउद्योजकांना स्टार्टअप कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी मदत होणार आहे. त्याचप्रमाणे बँक व शासकीय योजनांशी जोडणी करून आर्थिक साहाय्य मिळविण्याची संधी, कौशल्य, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचा थेट अनुभव व नेटवर्किंग होणार, जिल्ह्यातील नव्या उद्योग जगतात सक्रिय सहभाग व संधी उपलब्ध होणार आहे. सदर उद्घाटन समारंभास आपण उपस्थित राहून आपल्या प्रगतीसाठी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक,आयुक्त कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता,यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे

### महाराष्ट्र राजपत्रित नागरी संयुक्त पुर्व परीक्षा २०२५ साठी परीक्षा केंद्राच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ महाराष्ट्र राजपत्रित नागर संयुक्त पुर्व परीक्षा २०२५ ही दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० व दुपारी ३.०० ते ६.०० या वेळेत जालना जिल्ह्याच्या बद्रीनारायण बारवाले कॉलेज एमआयडीसीजवळ औरंगाबाद रोड, जालना. मत्सोदरी शिक्षण संस्था अंकुशराव टोपे कॉलेज, मोतीबाग ओव्हरब्रीज जवळ जालना. राष्ट्रीय हिंदी विद्यालय, देऊळगावराजा रोड, जालना. श्री. एम.एस. जैन विद्यालय (मराठी मिडियम), गणेश नगर छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, जालना या ४ केंद्रावर घेण्यात येणार असुन अपर जिल्हादंडाधिकारी यांच्या भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये परीक्षा उपकेंद्राच्या २०० मीटर परिसरात परीक्षेच्या दिवशी सर्व सार्वजनिक टेलिफोन/ एसटीडी बुथ/फॅक्स/झेरॉक्स व ध्वनीक्षेपके बंद ठेवण्याचे प्रतिबंधात्मक आदेश लागु केले आहे. हा आदेश दि. २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजेपासून सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत लागु राहतील असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी गणेश महाडिक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिले आहेत.

### ३ ते ९ ऑक्टोबर २०२५ अभिजात मराठी भाषा सप्ताह म्हणुन साजरा करण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस व दि. ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ हा कालावधी अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्याचे प्रशासनाने निर्देश दिले आहे.सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये/महामंडळे, केंद्र शासनाव्या अखत्यारीतील राज्यातील सर्व कार्यालये, मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी उद्योग, आस्थापना व व्यापारी बँक, सर्व शैक्षणिक संस्था/विद्यापीठे/महाविद्यालये इत्यादी सर्व संस्थामध्युन अभिजात मराठी भाषे संदर्भात जास्तीत जास्त संशोधन,संवर्धन व जनजागृती व्हावी या हेतूने प्रतिवर्षी दि . ३ ऑक्टोबर हा दिवस अभिजात मराठी भाषा दिवस व दि. ३ ऑक्टोबर ते ९ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत अभिजात मराठी भाषा सप्ताह साजरा करण्याचे जिल्हाधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे आवाहन केले आहे.

### जिल्हा जाती प्रमाणपत्र समितीमार्फत २ ऑक्टोबर पर्यंत जात प्रमाणपत्र पडताळणी विशेष मोहीम

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना / प्रतिनिधी**/ राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा कालावधीनिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत विद्यार्थ्यांकरीता जात प्रमाणपत्र पडताळणीसाठी विशेष मोहीमेचे आयोजन उपायुक्त जिल्हा जाती प्रमाणपत्र पडतळणी समिती यांनी केले आहे.जिल्ह्यात सेवा पंधरवाड्यात ११ वी १२ वी विज्ञान शाखेतील प्रवेशित मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व प्रवेशित व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेशीत त्रुटी पुर्ततेअभावी प्रलंबीत विद्यार्थ्यांना जात वैधताप्रमाणपत्र देण्यासाठी विशेष मोहिम राबविली जाणार आहे. जी त्रुटी पुर्ततेअभावी प्रलंबित प्रकरणे आहेत अशा अर्जदारांना ई-मेलद्वारे कळविले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813